महाराष्ट्र शासन

तत्काळ

क्र. प्रतिनि-१२१८/अनौसं.०८/प्र.क्र.२२/का.१४
सामान्य प्रशासन विभाग, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- १७.०२.२०१८

प्रति,

सह/उप सचिव (आस्थापना),
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "मुख्य प्रशासकीय अधिकारी" हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "मुख्य प्रशासकीय अधिकारी" हे पद प्रतिनियुक्तीने भरवयाचे आहे. सदर पद मंत्रालयीन सह/उप सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांमधून भरावयाचे आहे.

२. सदर पदावर प्रतिनियुक्तीने जाण्याकरीता इच्छुक असलेल्या व सदर पदासाठी आवश्यक असलेली अर्हता तसेच अनुभव धारण करीत असलेल्या आपल्या विभागातील सह/उप सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांची नावे, त्यांच्या मागील ५ वर्षाच्या सह सचिवांपेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यांनी साक्षांकीत केलेल्या गोपनीय अहवालांसह, पत्रासोबत जोडलेल्या BIO-DATA/CURRICULUM VITAE PROFORMA मधील वैयक्तिक माहिती व ना-विभागीय चौकशीचे प्रमाणपत्र इ. बाबतच्या माहितीसह या विभागाकडे दि.२०.२.२०१८ पर्यंत निश्चितपणे प्राप्त होतील अशा रितीने कृपया पाठवावीत. तसेच इच्छुक अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीसाठी निवड झाल्यास त्यांना संबंधित विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे याबाबतही कृपया अभिप्राय द्यावेत. आपल्या विभागातून प्रतिनियुक्तीसाठी कोणीही अधिकारी इच्छुक नसल्यास निरंक असेही कृपया कळविण्यात यावे. एकदा निवड झालेल्या अधिकाऱ्याला त्याचे नाव मागे घेता येणार नाही.

३. सदर पत्राची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८०२२०११३२४०१३०७ असा आहे. हे पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

आपला,

Gajanan
Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra,
ou=General Administration Department,
postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0,
serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf,
cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2018.02.20 11:34:46 +05'30'

(ग.भि.गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र :- विवरणपत्र

अ.क्र.	मुद्दा	तपशिल/अभिप्राय
१	अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे संपूर्ण नाव	
२	जन्मदिनांक	
३	शैक्षणिक अर्हता	
४	भ्रमणध्वनी क्रमांक	
५	मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत.)	
६	मत्ता व दायित्वे सादर केली आहेत का?	
७	५०/५५ व्या वर्षी पुनर्विलोकन केले आहे का? (लागू असल्यास)	
८	संबंधित अधिकाऱ्याला यापूर्वी प्रतिनियुक्ती दिली असल्यास तपशील (पद व कालावधी) (प्रतिनियुक्तीचा एकूण कालावधी १० वर्षापेक्षा जास्त नसावा)	दिनांकापासून ते दिनांकापर्यंत | पद /प्रतिनियुक्तीचे ठिकाण एकूण कालावधी
९	मागील प्रतिनियुक्तीवरून परत आल्याच्या दिनांकापासून ५ वर्षे पूर्ण झाली आहेत का?	
१०	संबंधित अधिकाऱ्यांविरूध्द विभागीय चौकशी सुरू अथवा प्रस्तावित आहे काय?	
११	प्रतिनियुक्तीकरीता निवड झाल्यास विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे.	